RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १८(२)] मंगळवार, जुलै १५, २०२५/आषाढ २४, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ८६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

### महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **१५ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम **११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LXXXI OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PRIVATE UNIVERSITIES (ESTABLISHMENT AND REGULATION) ACT, 2023.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८१.**

**महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन)
२०२४ चा महा. ८. अधिनियम, २०२३ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या अनुसूची ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ याला जोडलेल्या अनुसूचीमध्ये, भाग दोन मधील,– २०२४ चा महा. ८.

(एक) स्तंभ (२) मधील, डॉ. डी. वाय. पाटील ज्ञान प्रसाद विद्यापीठ, पुणे याच्याशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक ४ येथील नोंदीमध्ये, उक्त विद्यापीठाचे नाव, ठिकाण व मुख्यालय याऐवजी, पुढील नाव, ठिकाण व मुख्यालय दाखल करण्यात येईल :–

"ज्ञान प्रसाद ग्लोबल विद्यापीठ, मुख्यालय ज्ञान प्रसाद ग्लोबल विद्यापीठ, पिंपरी कॅम्पस, सर्व्हे क्रमांक १८०/२/१ व १८०/२/२, संत तुकाराम नगर, पिंपरी - ४११०१८ आणि तसेच ज्ञान प्रसाद ग्लोबल विद्यापीठ, ताथवडे कॅम्पस, सर्व्हे क्रमांक ८७/१, ८८, १३८/१अ, १३८/१ब, १३८/२ब व ६२/४/३, ताथवडे-४११०३३, पिंपरी-चिंचवड, तालुका हवेली, पुणे, महाराष्ट्र येथील ठिकाणे.";

(दोन) नोंद ७ नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :–

| | | |
|---|---|---|
| "**८.** | पिल्लै विद्यापीठ, नवी मुंबई, मुख्यालय डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लै कॅम्पस, सेक्टर १६, प्लॉट क्रमांक १०, १०ए व २१, न्यू पनवेल, नवी मुंबई, तालुका पनवेल, जिल्हा रायगड-४१० २०६ आणि तसेच सर्व्हे क्रमांक ७८/३२, चौक फाटा, हातनोली व जांभिवली, तर्फे वनखळ, तालुका खालापूर, जिल्हा रायगड-४१० २०६, महाराष्ट्र येथील ठिकाण. | महात्मा एज्युकेशन सोसायटी, चेंबूर नाका, मुंबई-४०००७१.". |

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता राज्यात स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठाची स्थापना, विधिसंस्थापन व विनियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ (२०२४ चा महा. ८) अधिनियमित केला आहे.

**२.** उक्त अधिनियमाच्या कलम ६ मध्ये अशी तरतूद आहे की, शासन, उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, प्रायोजक मंडळाने उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या तरतुदींचे अनुपालन केले आहे याबाबत खात्री पटली असेल तर, राज्य विधानमंडळाद्वारे कायदा अधिनियमित करून त्याद्वारे अनुसूचीमध्ये केलेल्या सुधारणेद्वारे, अनुसूचीच्या भाग दोनमध्ये, खाजगी विद्यापीठाचे व त्याच्या प्रायोजक मंडळाचे नाव, ठिकाण व मुख्यालय समाविष्ट करून, त्याद्वारे खाजगी विद्यापीठ स्थापन करण्यास परवानगी देऊ शकेल.

**३.** उक्त कलम ६ नुसार, डॉ. डी. वाय. पाटील ज्ञान प्रसाद विद्यापीठ, पुणे याची स्थापना केली आहे. आता, डॉ. डी. वाय. पाटील ज्ञान प्रसाद विद्यापीठ, पुणे याच्या प्रायोजक मंडळाने, अनुसूचीच्या भाग दोन मध्ये नमूद केलेले उक्त विद्यापीठाचे नाव, ठिकाण व मुख्यालय बदलण्यासाठी ठराव पारित केला आहे आणि उक्त अधिनियमात सुयोग्य सुधारणा करण्यासाठी शासनाला विनंती केली आहे.

**४.** उक्त अधिनियमाच्या कलम ६ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, शासनाची अशी खात्री पटली आहे की, "पिल्लै विद्यापीठ, नवी मुंबई" या नावाने खाजगी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी, प्रायोजक मंडळ, महात्मा एज्युकेशन सोसायटी, चेंबूर नाका, मुंबई-४०००७१ याने, उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या तरतुदींचे अनुपालन केलेले आहे.

**५.** म्हणून, डॉ. डी. वाय. पाटील ज्ञान प्रसाद विद्यापीठ, पुणे याचे नाव, ठिकाण व मुख्यालय यांमध्ये बदल करण्याच्या दृष्टीने आणि पिल्लै विद्यापीठ, नवी मुंबई हे, स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठ स्थापन करण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यास जोडलेल्या अनुसूचीच्या भाग दोनमध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

**६.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १४ जुलै, २०२५.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १५ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव -१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.